ISBN - 978-93-81921-46-3

# Terrorism : A Challenge before Human Rights

HUMAN RIGHTS EDUCATION
SANGAMNER COLLEGE

# दहशतवाद : मानवी हक्कांसमोरील आव्हान

**Editor**
**Prin. Dr. K. K. Deshmukh**
**Dr. Pratap Phalphale**

Scanned by CamScanner

 ISBN- 978-93-81921-46-3

University Grants Commision, New Delhi, India
Sponsored

INTERNATIONAL CONFERENCE

(INTERDISCIPLINARY)

ON

# TERRORISM : A CHALLENGE BEFORE HUMAN RIGHTS

14th March 2015

- Organized by -
Shikshan Prasarak Sanstha's
S.N.Arts, D.J.M. Commerce & B.N.S. Science College, Sangamner
Dist. Ahmednagar (M.S.) Pin- 422 605
**Faculty of Social Sciences**

**Dr. Pratap J. Phalphale**
Co-ordinator

**Dr. K. K. Deshmukh**
Convener

NAAC Reaccredited 'A' Grade
Savitribai Phule Pune University - Best College Award
An ISO 9001:2008 Certified Institution

# Volume II



Scanned by CamScanner

 ISBN-978-93-81921-46-3

# दहशतवाद आणि मानवी अधिकार

**श्री. सचिन नागोराव कसबे**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

**प्रस्तावना :**

एकविसाव्या शतकात **'दहशतवाद'** ही गंभीर समस्या बनलेली आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा प्रारंभ 1960 नंतर वेगाने झाला. 'लैला खालदे' या पॅलिरिटनी स्त्रीने लंडनला जाणाऱ्या विमानाचे अपहरण करून सर्व जगाला आश्चर्याने थक्क करून सोडले. स्वतःच्या मातृभूमीतून हकालपट्टी केलेला दुदैवी समुदाय म्हणून सर्व जगात पॅलिरिटनी लोंकाच्याबद्दल आपुलकी व सहानुभूती वाटत होती. या नाटकाच्या पहिल्या अंकानंतर अधिक निष्पाप जीवांची हत्या केली जाऊ लागली. पाश्चिमात्य राष्ट्राच्या विमानांचे अपहरण एक आंतरराष्ट्रीय हत्यार म्हणून त्यांनीच प्रथम वापरण्यात सुरूवात केली. युरोपातील जहाल दहशतवादी गटांनी याच सुमारास युरोपात सर्वत्र महत्त्वाच्या ठिकाणी अगर मोटारीत स्फोट घडवून आणले. राजनैतिक प्रतिनिधीचे, उद्योगपतींचे अगर लष्करी अधिकाऱ्यांचे अपहरण करणे, पाळत ठेवून एखाद्या महत्वाच्या अगर साधारण व्यक्तींची हत्या करणे यांचा धडाका चालविला. परस्परांशी संबंध नसलेल्या दहशतवादी टोळ्यांचे युरोपांत अमाप पीक निर्माण झाले. एवढेच नव्हे तर ही साथ जपान, उत्तर अमेरिका, दक्षिण व मध्य पूर्व अमेरिकेत पसरली. नंतर उपलब्ध पुराव्यानुसार असे सिध्द झाले की, P.L.O. , मुज्जाहिद, आर्मेनियातील आसला, जर्मनीतील बेदर–मेनहॉफ गट आणि इटलीतील रेड ब्रिगेड व जपानमधील रेंड आर्मी यांचा परस्परांशी संबंध होता. एवढेच नव्हे तर, जहाल अरब राष्ट्रे आणि साम्यवादी राष्ट्रे यांच्याशी पण संबंध होता, हे एक आश्चर्य नव्हे काय?

दहशतवादी घटनेच्या मागे एखादे ध्येय, दावा अगर समस्या यांना मान्यता मिळवून द्यायची हे उद्दिष्ट असते. म्हणजेच प्रसिध्दी, मग ती चांगली असो अगर वाईट असो, दहशतवाद हा नेहमीच फौजदारी गुन्हा असतो.. मग तो खून असो वा खुनाची धमकी असो. अपहरण, जबरदस्तीने पकडून ओलीस ठेवणे, हेही दहशतवादातच मोडते. दहशतवादी जाळयात सापडलेल्या व्यक्ती कोणत्याही क्षणी ठार केल्या जाण्याची शक्यता असते. रागाने अगर द्वेषाने नव्हे, तर अगदी जाणूनबुजून, थंडपणाने, त्यामागे राजकिय हादरा बसावा हा उद्देश असतो. दहशतवाद हे युध्द नव्हे, गनिमी युध्द तर मुळीच नव्हे. युध्दात काही संकेत पाळले जातात. तटस्थ राष्ट्रांच्या प्रदेशात युध्दमुक्त म्हणून मान्यता दिली जाते. सामान्य नागरिक, स्त्रिया, मुले यांच्यावर हल्ले केले जात नाहीत. युध्दकैंदयांचा छळ केला जात नाही. पण दहशतवादी हे स्त्रिया, मुले, सामान्य नागरिक व निष्पाप व्यक्तींवरच हल्ले करतात आणि वरील संकेत पाळत नाहीत.

**दहशतवादाचा अर्थ :**

दहशतवादाने लपेटलेल्या आधुनिक जगात राज्यांना दहशवादाची व्याख्या करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अधिकृत पत्रकात, प्रकाशनात, भाषणात त्यांचा उल्लेख करावा लागतो. या व्याख्या



Scanned by CamScanner

प्रत्येक राज्याच्या राजकीय परिस्थितीप्रमाणे, घटकाप्रमाणेच बदलतात. संयुक्त राष्ट्र संघटनेत तीन गट आहेत. तिसऱ्या जगातील राज्यांचा गट, साम्यवादी राज्यांचा गट, पश्चिमेकडील राज्यांचा गट. या तिन्ही गटांचे व्याख्येबाबत एकमत नाही. नामीबियातील स्वापो बंडखोरांना दक्षिण आफ्रिका दहशतवादी मानते. तर तिसऱ्या जगातील राष्ट्रे त्यांना स्वातंत्र्य सैनिक मानतात. साम्यवादी निकारागुआ सरकारला विरोध करणाऱ्या लेपीरो ना अमेरिकन सरकार स्वातंत्र्य सैनिक मानते.

**मराठी तर्जुमा :-**

"एखाद्या विशिष्ट दाव्याचा अगर गाऱ्हाण्याचा प्रचार करण्याकरिता सवसामान्य जनात अगर त्यातील महत्वाच्या अंशात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने, दहशत निर्माण करण्यात आलेले बेकायदेशीर हिंसाचारा चे तंत्रे म्हणजेच दहशतवाद."

**जॉन केटन :-**

"राजकिय उद्दिष्ट साध्य करण्याकरिता समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भीती आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी वर्तणूक म्हणजेच दहशतवाद होय."

**अमेरिकन कायदेमंडळांच्या मते :-( 1984)**

"राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याकरिता काही व्यक्तिगत गटांनी, प्रस्थापित शासकीय अधिकाऱ्यांच्या बाजूने अगर विरुध्द कारवाई करताना दहशतीचा अगर हिंसाचाराचा केलेला वापर म्हणजेच दहशतवाद होय."

**दहशतवाद आणि मानवी अधिकार :-**

लोकशाहीतच दहशतवाद जन्म घेतो ही गोष्ट अत्यंत विचित्र वाटेल पण ती खरी आहे. दहशतवादी मग तो राजदूताचा पॉश पोषाख धारण करणारा असो किंवा जहाल भाषणे ठोकणारा समाजवादी असो. तो हे जाणतो की, लोकशाही स्वातंत्र्यामुळेच त्याला दहशतवादी चळवळीत सामील होता येते. दहशतवादी प्रक्रिया नियमित चालू राहण्याकरता संचार स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, व इलेक्ट्रानिक प्रसार माध्यमांची सुविधा यांची गरज भासते. लोकशाही राज्यातच दहशतवादी घटना विस्तृत क्षेत्रात घडतात कारण हालचाल करण्यास मोकळीक मिळते व प्रसिध्दीचा फायदा मिळतो.

**श्रीमती मार्गारेट थॅचर यांच्या** शब्दांत सांगायचे झाल्यास, केवळ अराजकता आणि अव्यवस्था असते तेथेच दहशतवाद असतो असे नाही. दहशतवाद्यांचे भगत आपल्या मुक्त समाजव्यवस्थेतील स्वातंत्र्यांचा गैरफायदा घेतात व हिंसाचार करतात. जितकी आपली समाजरचना मोकळी असते तितके आपण सावध राहिले पाहिजे.

**दहशतवादाचे लोकशाही राज्यांवरील दुष्परिणाम :-**

दहशतवादाने पछाडलेल्या एखाद्या राज्यावर विविध प्रकारचे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय दुष्परिणाम घडून येतात. श्रीलंका, लेबॅनॉन, निकारागुआ, अफगाणिस्तान, इराण, इटली या देशांत हे परिणाम जाणवतात. भारतात पंजाब व त्रिपुरा राज्यांत हे परिणाम जाणवले आहेत. दहशतवादामुळे एखाद्या राज्यांचे स्वरुप पालटण्याची शक्यता असते. राज्यातील अल्पसंख्य जनात, व बहुसंख्य जनात यांच्यातील ध्रुवीकरणामुळे राज्याच्या ऐक्याला

आणि एकात्मतेला धोका निर्माण होतो. श्रीलंकेत आणि उत्तर आयर्लंड येथे दहशतवादी हिंसाचार व त्याला उत्तर म्हणून राज्याचा प्रतिदहशतवाद, यामुळे राज्याची फाळणी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दहशतवादाचा आणखीन एक परिणाम म्हणजे राजकीय पक्षातील महत्वाच्या व्यक्तींच्या (व्ही.आय.पी) जीवीताला सतत धोका निर्माण होतो. त्यांना सतत पोलिस संरक्षणाखाली वावरावे लागते. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर दोन वेळा प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. इंग्लडच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांच्यावरही आय.आर.ए. च्या दहशतवाद्यांनी बॉबस्फोटाने हल्ला करून त्यांना ठार करण्याचा प्रयत्न केला.

दहशतवादी कारणामागे एक परिणाम म्हणजे मानवी संस्कृतीत जे काही सुंदर, भव्य आणि उदात्त आहे, त्याचा बळी दिला जातो. यात काव्य,साहित्य,कला,संस्कृती,सभ्यपणा, नीतीमत्ता यांना ओहोटी लागते. स्त्रिया, मुले, वृध्द आणि अपंग यांचीदेखील दहशतवादी हिंसाचारातून सुटका होऊ शकत नाही.

**सारांश :–**

दहशतवादाचा महत्वाचा परिणाम म्हणजे लोकशाहीतील नागरी स्वातंत्र्याचा बळी दिला जातो. वर्तमानपत्रांवर नियंत्रणे येतात. मुद्रणस्वातंत्र्यांवर बंधने येतात. दहशतवाद्यांकडून पत्रकारांना धमक्या दिल्या जातातच, पण राज्यशासन देखील पत्रकारांना कैदेत डांबते. राजकीय सभा व निरवणुकांवर बंदी घातली जाते. दहशतवादीविरोधी कायद्याचा आधार कोणत्याही व्यक्तीला अगर व्यक्तींना विनाचौकशी तुरूंगात डांबले जाते. संचार स्वातंत्र्य यावर बंदी घातली जाते. अशा तऱ्हेने सर्व वातावरण तणाव, विश्वास, संशय, दहशत आणि संघर्ष यांनी धूसर बनून जाते. जी राज्यपध्दती लोकांच्या जीविताचे, मालमत्तेचे रक्षण करूशकत नाही, अशा राज्यपध्दतीवरचा म्हणजे लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास उडू लागतो. ही राज्यपध्दती कुचकामी आहे, अशी लोकांची धारणा होऊ लागते व लष्करी राजवटीला अनुकूल वातावरण तयार होते.

**संदर्भसूची :–**


1. Mahmood Bin Muhammad (2004) : " The Anatomy of Terrorism", APH Publication, New Delhi.
2. Ram Puniyani ( 2005) : " Religion, Power And Violence", SAGE Publication, New Delhi.
3. उदगावकर म.न. (1990) : "दहशतवाद" प्रमोद प्रकाशन, सासवड, पुणे.
4. यादव वीरेन्द्र सिंह .(2011) : "आतंकवाद" ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
5. नेमा जी.पी., जैन राजेश, प्रसाद गोपाल : " आधुनिक राजनीतिक निबन्ध" विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
6. उदगावकर म.न. (2013) : "एकविसाव्या शतकातील दहशतवाद" डायमंड प्रकाशन, पुणे.
7. परिवर्तनाचा वाटसरू (पाक्षिक) : 1 ते 15 जानेवारी 2015.
8. http:/hi.wikipedia.org




Scanned by CamScanner

| Sr.No. | Title | Pg. No. |
|---|---|---|
| ६८. | **प्रा. अजय बापूसाहेब पाटील**<br>दहशतवाद आणि भारतीय सुरक्षा व्यवस्थेसमोरील आव्हाने | २९८ |
| ६९. | **प्रा.डॉ. साबळे एन. एस.**<br>वाढता दहशतवाद मानवी हक्कासमोरील मोठे आव्हान | ३०२ |
| ७०. | **प्रा.डॉ. सुवर्णा बेनके**<br>धार्मिक, वांशिक दहशतवाद : मानवी हक्कांपुढील आव्हान | ३०९ |
| ७१. | **प्रा.श्री. शशिकांत एन. बांगर**<br>काश्मीरचा दहशतवाद आणि मानवी हक्क | ३१३ |
| ७२. | **डॉ. श्रीमती मनिषा श्रीराम चौधरी**<br>मानवी हक्क आणि दहशतवाद | ३१९ |
| ७३. | **डॉ. उमाकांत वानखेडे प्रा. डी. एस. गोडगे**<br>मानवी हक्क आणि भारतीय महिला व दहशतवाद | ३२१ |
| ७४. | **प्रा. पोटे ए. ए.**<br>भारतासमोरील दहशतवादाची आव्हाने | ३२६ |
| ७५. | **प्रा. पेरके वैशाली शेषराव**<br>दहशतवाद आणि मानवी हक्क | ३३० |
| ७६. | **प्रा. शिवाजी दिवान**<br>दहशतवाद आणि मानवी हक्काची पायमल्ली | ३३४ |
| ७७. | **प्रा.सौ. सुपेकर वैशाली प्रशांत**<br>जैविक दहशतवाद आणि मानवी हक्क | ३३६ |
| ७८. | **प्रा. देवरे विनोद दोधा**<br>दहशतवाद मानवी हक्कांपुढील आव्हान | ३४० |
| ७९. | **प्रा.डॉ. जयराम ढवळे**<br>दहशतवाद आणि मानवी हक्क | ३४२ |
| ८०. | **डॉ. उमाकांत वानखेडे प्रा. कापडी विठ्ठलराव दामोदर**<br>दहशतवाद, मानवी हक्क आणि आदिवासी | ३४५ |
| ८१. | **श्री. सचिन नागोराव कसबे**<br>दहशतवाद आणि मानवी अधिकार | ३४९ |
| ८२. | **डॉ. जयश्री देशपांडे (मोटेगांवकर जे. बी.)**<br>कौटुंबिक दहशतवाद व मानवी मूल्य | ३५२ |
| ८३. | **प्रा. विजय वसंतराव भडके**<br>भारतातील विविध राज्यातील नक्षलवादाची स्थिती आणि अर्थकारण | ३५६ |
| ८४. | **प्रा. अभिमन्यू रा. ढोरमारे**<br>दहशतवादी वर्तन आणि मानसशास्त्रीय सिध्दांत | ३६१ |




Scanned by CamScanner